- RNI NO. MAHMAR/25/A3029
- लातूर
- वर्ष : ७ वे, अंक नं. : ७८
- दि.१५ जुलै २०२६, वार : बुधवार
- पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


### आषाढी वारीनिमित्त आयोजित चरण सेवा उपक्रमात

## लातूर येथे २५० पेक्षा अधिक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी

### मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचा उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय आणि लातूर शहर महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारीनिमित्त चरण सेवा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १२ आणि १३ जुलै २०२६ रोजी लातूर येथील श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर मंदिर येथे झालेल्या या उपक्रमात २५० पेक्षा अधिक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी व मोफत उपचार करण्यात आले.



नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथून आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या सद्गुरु श्री गुंडा महाराज संस्थानच्या दिंडीची परंपरा अनेक वर्षांपासून अखंड सुरू आहे. या दिंडीसोबत शेकडो वारकरी पायी वारी करून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला जातात. वारकऱ्यांच्या या पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करणे, त्यांच्या पायांची व स्नायूंची योग्य काळजी घेणे तसेच आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या नेतृत्वामध्ये राज्यभर चरण सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड व निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात सुमारे ६० वैद्यकीय व निमवैद्यकीय तज्ज्ञांच्या चमूने २५० हून अधिक वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, चरण सेवा व औषधोपचार उपलब्ध करून दिले.

वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयातर्फे वारकऱ्यांना आयुष उपचार पद्धतीद्वारे आवश्यकतेनुसार उपचार करण्यात आले. तसेच लातूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वैद्यकीय चमुमार्फत रुग्णांची आरोग्य तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधी देण्यात आली. या प्रसंगी संस्कार भारतीच्या चमूकडून काढण्यात आलेली आकर्षक रांगोळी आणि फुलांची सजावट सर्वांचे मुख्य आकर्षण ठरली होती.

सद्गुरु श्री गुंडा महाराज संस्थानचे दिंडी प्रमुख श्री गुरुराज महाराज यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, यामुळे वारकऱ्यांना मोठा फायदा होत असल्याचे सांगितले. हा स्तुत्य उपक्रम यशस्वी करण्यासाठी वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. विकास निलंगेकर व डॉ. सुनीता निलंगेकर आणि त्यांची टीम, आरोग्य विभाग लातूर शहर महानगरपालिका, संस्कार भारती संस्था, तसेच इतर सर्व सेवेकरी व स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

## मातंग समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील मातंग समाजातील मांग, मातंग, मिनी मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी, मादिगा या १२ पोटजातीतील २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेल्या व २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या इयत्ता १० वी, १२ वी. पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांकडून सरासरी ६०% पेक्षा जास्त गुण असलेल्या ‘‘साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती’’ करीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

अभ्यासक्रमामध्ये विशेष प्राविण्याने गुणवत्ता मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, शाळेचा दाखला, मार्कशीट, २ फोटो, पुढील वर्गात प्रवेश घेतल्याचा पुरावा इ.सह दोन प्रतीत आपल्या पुर्ण पत्यासह व भ्रमणध्वनी क्रमांकासह साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या), मुंबई गृहनिर्माणभवन, कलानगर, तळमजला, रुम नं. ३३, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१ या पत्त्यावर २७जुलै, २०२६ पर्यंत अर्ज करावा, असे जिल्हा व्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या), जिल्हा कार्यालय मुंबई शहर-उपनगर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.







# धाराशिव जिल्ह्याची मराठवाडा विभागीय काँग्रेस आढावा बैठक उत्साहात संपन्न

## संघटन बळकट करून काँग्रेसला राज्यात क्रमांक एकचा पक्ष बनविण्याचा निर्धार

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा विभागातील जिल्हानिहाय काँग्रेस आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

बैठकीत धाराशिव जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनतेशी सातत्याने संपर्क ठेवण्यासाठी प्रभावी कनेक्ट सेंटर उभारण्यावर भर देण्यात आला. प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या कामाची योग्य दखल घेतली जाईल, सर्वांना सोबत घेऊन काँग्रेस पक्ष अधिक सक्षम केला जाईल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.संघटन विस्तारासाठी जिल्हाध्यक्षांपासून जिल्हा कार्यकर्त्यांपर्यंत, तालुकाध्यक्षांपासून तालुका कार्यकर्त्यांपर्यंत तसेच मंडळ, सेक्टर, ग्राम, शाळा आणि वॉर्ड अध्यक्षांमध्ये प्रभावी समन्वय राखण्याच्या सूचना देण्यात आल्या. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मजबूत संघटन उभे करून काँग्रेसला



क्रमांक एकचा पक्ष बनविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. धाराशिव जिल्ह्यात काँग्रेसचा लोकप्रतिनिधी निर्माण करण्याची ही मोठी संधी असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

धाराशिव जिल्ह्यात एकदिलाने पक्षासाठी काम करण्याचे आवाहन करताना, जिल्ह्यांत राबविण्यात आलेल्या यशस्वी आंदोलने, निवेदने, प्रशिक्षण शिबिरे आणि जनसंपर्क उपक्रमांचे कौतुक करण्यात आले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचे प्रदेश नेतृत्वाकडून विशेष अभिनंदन करण्यात आले.

यावेळी धाराशिव जिल्हा काँग्रेसचे नूतन जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर यांनी अल्पावधीत संघटनात्मक पातळीवर केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेत त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कमी कालावधीत प्रभावी कामगिरी करून जिल्ह्याला संघटनात्मकदृष्ट्या आघाडीवर नेल्याबद्दल त्यांचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अभिनंदन व सत्कार केला.

बैठकीचा समारोप काँग्रेस पक्ष अधिक मजबूत करण्याचा, संघटनाच्या प्रत्येक स्तरावर समन्वय वाढविण्याचा आणि आगामी निवडणुकांमध्ये यश मिळविण्यासाठी एकजुटीने काम करण्याच्या निर्धाराने झाला.

या आढावा बैठकीस धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर, स्मिता शहापूरकर, पांडुरंग कुंभार,हनुमंत पवार, राजाभाऊ शेरखाने, प्रशांत पाटील, आश्लेष मोरे, अझर पठाण, खलील सय्यद,मेहबूबपाशा पटेल,अग्निवेश शिंदे ,धनंजय राऊत, ॲड. नुरोद्दीन चौधरी, विलास शाळू, आप्पासाहेब शेळके, ॲड.अरविंद बेडगे, ॲड. सिराज मोगल, दयानंद पाटील,अर्जुन बिराजदार,अमर तागडे, विजय वाघमारे, राजू तोरकडे,विजय दलगडे, गणेश पवार, मोईज सय्यद, ॲड. मुशरफ सय्यद, शिवाजी गायकवाड, अबेदिन कुरेशी, आयुब पठाण अभिषेक बागल, सर्फराज काझी, चंद्रकांत जाधव,भूषण देशमुख, गणेश चव्हाण, गोरोबा झेंडे, भारत काटे, दिगंबर गायकवाड, सुरेश जगताप, मोहिब शेख,हनुमंत सांगवे, अमित रेड्डी,बाबा आवटी,ॲड. एस पी इनामदार,शशिकांत निरपळ, रोहित कसबे, जीवन चौगुले, दिलीप क्षीरसागर, बप्पा मैंदाड, पृथ्वीराज देशमुख, हरिदास शिंदे तसेच बैठकीला धाराशिव जिल्ह्यांचे पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी,कार्यकर्ते, सहकारी तसेच आजी माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांच्या माथी एसआयआर आणि अशैक्षणिक कामांचे ओझे: शैक्षणिक गुणवत्तेचे अध:पतन आणि सामाजिक वास्तव

भारताच्या भावी पिढीची जडणघडण शाळांच्या चार भिंतीत आणि गुरुंच्या मार्गदर्शनाखाली होत असते. मात्र, सध्या महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्र एका विचित्र विसंगतीचा सामना करत आहे. एकीकडे 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' आणि 'शैक्षणिक प्रगती' यांवर आधारित धोरणात्मक घोषणांची गर्दी आहे, तर दुसरीकडे प्रत्यक्ष शाळांमध्ये शिक्षक वर्गाच्या बाहेर सरकारी सर्वेक्षणाच्या कामांत व्यस्त आहेत.

'विद्येविना मती गेली, मतीविना गती गेली' हा महात्मा फुलेंचा संदेश विसरून, आज शिक्षकाला ज्ञानाच्या मंदिराऐवजी घरोघरी जाऊन माहिती गोळा करण्याच्या कामात गुंतवण्यात आले आहे. हे केवळ वेळेचे नुकसान नसून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा बट्ट्याबोळ करणारा प्रकार आहे. २९ जून ते ३१ जुलै या कालावधीत शिक्षकांवर सोपवण्यात आलेले मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण काम हे त्यांच्यावर लादण्यात आलेल्या अशैक्षणिक कामांचा केवळ एक भाग आहे. एका शिक्षकाला सरासरी ३५० ते ४०० घरांपर्यंत पोहोचून माहिती गोळा करावी लागते, ज्यामुळे शिक्षकांची प्रचंड ओढाताण होत आहे. एका फॉर्मसाठी सुमारे २० मिनिटांचा वेळ खर्च होतो, याचा अर्थ एका शिक्षकाचे तासंतास केवळ माहिती संकलनात आणि फॉर्म भरण्यात वाया जातात.

शिक्षक आधीच जनगणनेचे काम, टीईटी परीक्षेची तयारी आणि नवीन अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणात गुंतलेले आहेत. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच शिक्षकांना शाळेबाहेर काढल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान अनिवार्य ठरत आहे. आरटीई कायद्यानुसार, प्राथमिक शाळांमध्ये वर्षातून किमान २०० दिवस आणि माध्यमिक शाळांमध्ये २२० दिवस अध्यापन होणे अनिवार्य आहे. मात्र, जेव्हा शिक्षक महिनाभर सर्वेक्षणाच्या कामात व्यग्र असतात, तेव्हा हे कायदेशीर नियम धाब्यावर बसवले जातात.





नीती आयोगाच्या अहवालानुसार, महाराष्ट्रात ८,००० हून अधिक एक शिक्षकी शाळा आहेत, जिथे दीड लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशा शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न अनुत्तरित आहे. शिक्षक वर्गाबाहेर असताना शिक्षण वाऱ्यावर ही म्हण तंतोतंत लागू होते. शालेय प्राथमिक विद्यार्थी आपल्या पालकांना आज प्रश्न विचारत आहेत की, आमचे शिक्षक आमच्यासोबत कमी वेळ का घालवतात...?. प्रशासनाने सुरुवातीला शिक्षकांना शाळा सांभाळून हे काम पूर्ण करण्याचे आदेश दिले, जे पूर्णतः अव्यवहार्य होते. त्यानंतर संघटनांच्या विरोधानंतर आदेश बदलून सुट्टीच्या दिवशी किंवा शाळेच्या वेळेव्यतिरिक्त काम करण्यास सांगितले गेले. यातून प्रशासनाची शिक्षकांबाबतची अनास्था दिसून येते.

शिक्षकांना केवळ कामगार किंवा वेठबिगार समजण्याची प्रवृत्ती बदलणे आवश्यक आहे. शिक्षकाला सतत नवीन कामांच्या ओझ्याखाली दाबल्यामुळे त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर आणि अध्यापन कौशल्यावर नकारात्मक परिणाम होत आहे. शिक्षक हा केवळ सरकारी कामाचा एक पर्याय नसून तो राष्ट्रनिर्माता आहे. विविध उच्च न्यायालयांनी वेळोवेळी शिक्षकांना अशैक्षणिक कामांपासून मुक्त ठेवण्याचे आदेश दिले आहेत. असे असतानाही, प्रशासकीय सुलभतेसाठी निवडणूक आयोगाच्या किंवा महसूल विभागाच्या कामांसाठी शिक्षकांचा वापर करणे हे कायदेशीर चौकटीत कितपत योग्य आहे, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

महात्मा फुले यांनी मांडलेल्या शिक्षणाच्या सिद्धांतानुसार, जेव्हा शिक्षण व्यवस्थेचा कणा मोडला जातो, तेव्हा समाजाचा विकास थांबतो. गोरगरिबांची मुले सरकारी शाळांवर अवलंबून आहेत. शिक्षकांविना त्यांचे शैक्षणिक नुकसान ही मोठी सामाजिक हानी आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास मागे पडत आहे आणि त्याची भरपाई कोण करणार...? हा मोठा प्रश्न आहे.

शिक्षक संघटनांनी या विरोधात समयप्रसंगी आवाज उठवला आहे, परंतु प्रशासनाकडून त्यांना सातत्याने मिळणारी वागणूक ही लोकशाहीत शोभणारी नाही. काही शाळांच्या वेळेत पर्यायी बदल (सकाळी ७ ते १२:३०) करून एक तात्पुरता उपाय काढला असला, तरी ही कायमस्वरूपी मलमपट्टी नाही. शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी शिक्षकांना निवडणुकीच्या किंवा सर्वेक्षणाच्या कामांतून पूर्णपणे मुक्त करणे आवश्यक आहे. बीएलओ किंवा तत्सम कामांसाठी महसूल विभागातील अन्य विभागातील कर्मचाऱ्यांचा वापर करावा. एक शिक्षकी शाळांना अशा सर्वेक्षणांच्या व्याप्तीतून पूर्णपणे वगळले पाहिजे. शिक्षकांचा ९०% वेळ हा केवळ अध्यापन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच खर्च होईल याची खात्री करण्यासाठी शासनाने कडक धोरणे आखावीत.



**मा.ना.झेंपलवाड यादव**
स्तंभ लेखक/
राजकीय विश्लेषक
**मो.९०११४११४९२**

शिक्षक वर्गातच नसेल, तर शिक्षण कोणाला मिळणार...?हा प्रश्न आता समाज आणि सरकार दोघांनीही गांभीर्याने घेण्याची वेळ आली आहे. शिक्षकांना केवळ माहिती गोळा करण्याचे साधन न समजता, त्यांना सन्मानपूर्वक अध्यापनाचे कार्य करू देणे हे राष्ट्राच्या हिताचे आहे.आपण जर शिक्षकांना अशाच प्रकारे कामाच्या ओझ्याखाली गाडले, तर भविष्यातील पिढीला अशिक्षित राहण्याची शिक्षा भोगावी लागेल. विद्येविना आपला विकास होऊ शकत नाही आणि शिक्षकांशिवाय शिक्षण पूर्ण होऊ शकत नाही, हे धोरणकर्त्यांनी वेळीच ओळखले पाहिजे.

# संपादकीय...

## भारत आणि इंग्लंड मुक्त व्यापार करार वस्त्रोद्योगासाठी मोठी सुवर्णसंधी

१५ जुलैपासून लागू होणारा भारत आणि इंग्लंड मुक्त व्यापार करार वस्त्रोद्योगासाठी मोठी सुवर्णसंधी आहे. ब्रिटनने भारतीय कापड आणि तयार कपड्यांवरील आयात शुल्क १२ टक्क्यांपर्यंत पूर्णपणे माफ केले आहे. नुकतेच भारत आणि ब्रिटन यांच्यातील १५ जुलैपासून लागू होणाऱ्या मुक्त व्यापार कराराचे नियम अधिकृतपणे जारी करण्यात आले आहेत. हा करार भारताच्या टेक्स्टाईल क्षेत्राचा चेहरामोहरा बदलणारा म्हणजेच सर्वात मोठा 'गेम चेंजर' ठरणार आहे. या करारांतर्गत यूकेने भारतीय वस्त्रांवर लागणारे १२ टक्क्यांपर्यंतचे आयात शुल्क पूर्णपणे शून्य केले आहे. यामुळे ब्रिटिश बाजारपेठेत बांगला देश आणि व्हिएतनामसारख्या प्रतिस्पर्धी देशांच्या तुलनेत भारतीय कापड आणि रेडिमेड कपडे अत्यंत स्वस्त आणि स्पर्धात्मक होतील. या मुक्त व्यापार कराराच्या थेट लाभामुळे आणि भारतीय निर्यातदारांनी वेळेवर केलेल्या जय्यत तयारीमुळे इंग्लंड तसेच संपूर्ण युरोपीय बाजारपेठेत भारतीय कपड्यांच्या मागणीत १२ ते २५ टक्क्यांची मोठी वाढ होण्याचा अंदाज आहे. सद्य:स्थितीत अनेक जागतिक ब्रँड आपली पुरवठा साखळी (सप्लाय चेन) चीनमधून इतरत्र हलवत आहेत. यामुळे भारताला जागतिक स्तरावर एक खूप मोठी बाजारपेठ काबीज करण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. भारतातील वस्त्रोद्योग क्षेत्र सद्य:स्थितीला देशातील सुमारे ४.५ कोटींहून अधिक लोकांना थेट रोजगार पुरवत असून या बाजारपेठेचा एकूण आकार सुमारे १७४ अब्ज डॉलर इतका अवाढव्य आहे. या महत्त्वाच्या क्षेत्राला बळकटी देण्यासाठी सरकार अत्यंत धोरणात्मक पद्धतीने पावले टाकत आहे. पश्चिम आशियातील संकटामुळे प्रभावित झालेल्या टेक्स्टाईल क्षेत्राला आणि निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी सरकारने एक जूनपासून पुढील पाच महिन्यांसाठी कापूस आयातीवर लागणारे सीमा शुल्क पूर्णपणे माफ केले आहे. गेल्या १२ वर्षांमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारने या क्षेत्राच्या सुधारणेसाठी अनेक बहुआयामी निर्णय घेतले आहेत, ज्याचे सकारात्मक परिणाम आता स्पष्टपणे दिसत आहेत. याच पार्श्वभूमीवर जागतिक आणि देशांतर्गत क्रेडिट रेटिंग एजन्सीजनी भारताच्या टेक्स्टाईल क्षेत्राचे मानांकन सुधारले आहे. इन्व्हेस्टमेंट इन्फॉर्मेशन अँड क्रेडिट रेटिंग एजन्सी (आयसीआरए) ने या क्षेत्राचा आऊटलुक 'निगेटिव्ह'वरून वाढवून थेट 'स्टेबल' केला आहे.

एक जून रोजी भारत आणि ओमान यांच्यातील सीईपीए म्हणजेच व्यापक आर्थिक भागीदारी करार लागू झाला आहे. या करारांतर्गत ओमानने भारताच्या टेक्स्टाईलसह ९९ टक्क्यांहून अधिक उत्पादनांवरील आयात शुल्क पूर्णपणे शून्य केले आहे. याव्यतिरिक्त संयुक्त अरब अमिराती (यूएई), ऑस्ट्रेलिया आणि आईसलँड, स्वित्झर्लंड, नॉर्वे आणि लिकटेंस्टीन या चार युरोपीय देशांचा समूह असलेल्या 'इफ्ता'सोबत यशस्वीरीत्या लागू झालेल्या मुक्त व्यापार करारांमुळे भारताच्या कापड निर्यातीत प्रचंड वाढ झाली आहे. आगामी काही महिन्यांत न्यूझीलंड आणि युरोपीय संघासोबत होणाऱ्या करारांमुळे ही निर्यात आणखी वेगाने वाढेल. युरोपातील २७ देशांचा समूह असलेल्या युरोपीय संघासोबतचा करार पूर्ण झाल्यानंतर अवघ्या २ ते ३ वर्षांत भारताची तेथील कापड निर्यात सुमारे २० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचू शकते. तसेच अमेरिकेसोबत सुरू असलेल्या द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यामुळे भारताला धागे आणि कापसापासून बनवलेल्या वस्त्रांवर अमेरिकन बाजारपेठेत मोठी शुल्क सवलत मिळणार आहे.

भारतातील वस्त्रोद्योग क्षेत्राला आधुनिक बनवण्यासाठी आणि कामगारांच्या कल्याणासाठी ९ मे रोजी संपूर्ण देशात जमीन पातळीवर लागू करण्यात आलेल्या चार नवीन श्रम संहिता (लेबर कोड) अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. यासोबतच केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाने सुरू केलेली 'पीएम मित्र पार्क' योजना या क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरत आहे. या योजनेअंतर्गत देशात ७ मेगा इंटिग्रेटेड टेक्स्टाईल रीजन अँड परल पार्क स्थापित करण्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. हे पीएम मित्र पार्क प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या '५-एफ' व्हिजनवर आधारित आहे. यामध्ये फॉर्म ते फायबर (शेतापासून धाग्यापर्यंत), फायबर ते फॅक्टरी (धाग्यापासून कारखान्यापर्यंत), फॅक्टरी ते फॅशन (कारखान्यापासून फॅशनपर्यंत) आणि फॅशन ते फॉरेन (फॅशनपासून परदेशापर्यंत) या संपूर्ण साखळीचा समावेश आहे. 'आत्मनिर्भर भारत' निर्माण करण्याच्या दृष्टीने आणि भारताला जागतिक कापड नकाशावर मजबूतपणे प्रस्थापित करण्यासाठी ही योजना मैलाचा दगड ठरेल. या विशेष पार्क्सच्या माध्यमातून वस्त्रोद्योग क्षेत्रात सुमारे एक लाख कोटी रुपयांची अवाढव्य गुंतवणूक येण्याचा अंदाज आहे. चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या केंद्रीय बजेटमध्ये टेक्स्टाईल क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या अभूतपूर्व तरतुदींची अंमलबजावणी एक एप्रिलपासून वेगाने सुरू झाली आहे. बजेटमधील 'टेक्स-इको' ही नवी उपक्रम प्रणाली आंतरराष्ट्रीय मानकांवर आधारित आहे. या बजेटमध्ये उद्योग आणि नामांकित शैक्षणिक संस्थांच्या परस्पर सहकार्याने वस्त्र कौशल्य परिसंस्थेला अत्याधुनिक बनवण्यासाठी 'सामर्थ्य-२' या विशेष योजनेचे अनावरण करण्यात आले आहे. तसेच ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी 'महात्मा गांधी ग्राम स्वराज' उपक्रम अत्यंत मोलाचा ठरत आहे. हा उपक्रम प्रामुख्याने खादी, हातमाग आणि हस्तशिल्प क्षेत्राला मजबूत करत असून 'एक जिल्हा एक उत्पादन' या धोरणालाही मोठे समर्थन देणारा आहे. या सर्व प्रयत्नांमुळे भारताचा वस्त्रोद्योग तांत्रिक दृष्ट्या अधिक सक्षम आणि आधुनिक बनत आहे. वस्त्रोद्योग क्षेत्राच्या विकासाच्या या मोठ्या संधी उपलब्ध असतानाच या उद्योगाला काही महत्त्वाच्या आव्हानांचाही सामना करावा लागत आहे. गेल्या काही वर्षांत जागतिक स्तरावरील अनिश्चितता आणि बदलांचा मोठा दबाव या क्षेत्रावर राहिला आहे. वर्ष २०२६ मध्ये वाढत्या संधींसोबतच अनेक मोठी आव्हाने उद्योजकांसमोर उभी आहेत. यामध्ये प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरील जिओपॉलिटिकल (भू-राजकीय) तणावामुळे लॉजिस्टिक्स आणि मालवाहतुकीत येणारे मोठे अडथळे, कच्च्या मालाचा आणि इनपुटचा वाढता खर्च, विविध आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन करण्याचा वाढलेला खर्च (कम्प्लायन्स कॉस्ट) आणि जगातील इतर सोर्सिंग देशांमधील वाढती तीव्र स्पर्धा यांचा समावेश आहे. या आव्हानांवर मात करून निर्यात वाढवण्यासाठी आणखी व्यापक प्रयत्नांची गरज निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत १५ जुलैपासून लागू होणाऱ्या भारत- इंग्लंड मुक्त व्यापार करारामुळे आणि १ जून ते ३० ऑक्टोबर या काळासाठी कापूस आयातीवर दिलेल्या सीमा शुल्क सवलतीमुळे भारतीय वस्त्रोद्योगाला मोठा दिलासा मिळणार आहे. या धोरणात्मक सुधारणांमुळे आगामी काळात जागतिक बाजारपेठेत भारताचे निर्यातदार अधिक मजबूतपणे टिकून राहतील. जर हे प्रयत्न असेच सुरू राहिले, तर निश्चित केलेल्या उद्दिष्टानुसार वर्ष २०३० पर्यंत भारताच्या टेक्स्टाईल बाजारपेठेचा एकूण आकार ३५० अब्ज डॉलरवर पोहोचेल आणि देशाची एकूण कापड निर्यात १०० अब्ज डॉलरचा टप्पा पार करेल. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे वर्ष २०३० पर्यंत एकट्या वस्त्रोद्योग क्षेत्रात सुमारे ३.५ कोटींहून अधिक रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, ज्यामुळे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला एक नवी आणि शाश्वत दिशा मिळेल.

# शिक्षण, संशोधन आणि समाजसेवेची प्रेरणादायी वाटचाल डॉ. इमरान मोहम्मद गौस शेख यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

१५ जुलै हा दिवस तरुण, अभ्यासू आणि समाजाभिमुख वैद्यकीय व्यावसायिक डॉ. इमरान मोहम्मद गौस शेख यांच्या वाढदिवसाचा. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या शैक्षणिक, वैद्यकीय आणि सामाजिक प्रवासाचा आढावा घेणे ही त्यांच्याप्रती शुभेच्छांचीच एक सुंदर अभिव्यक्ती ठरेल.

डॉ. इमरान शेख यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बीड येथील संस्कार विद्यालयात झाले. बालपणापासूनच अभ्यासाची आवड, जिद्द आणि कठोर परिश्रम ही त्यांची ओळख राहिली. त्यानंतर त्यांनी लातूर येथील रिलायन्स कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान शाखेत शिक्षण घेतले. जीवशास्त्र विषयातील विशेष प्रावीण्यामुळे त्यांनी गुणवत्तापूर्ण यश संपादन केले.

पुढे कर्नाटकातील मणिपाल येथे त्यांनी बी.ए.एम.एस.चे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणादरम्यान प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षात उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्णपदके मिळविल्याचा मान त्यांनी मिळविला. वैद्यकीय शिक्षणाबरोबरच संशोधनाची आवड जोपासत त्यांनी रक्ताच्या कर्करोगासंदर्भातील संशोधनातहीसहभागनोंदविला. डॉ. इमरान शेख यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबाचे संस्कार आणि शिक्षणावरील नितांत श्रद्धा आहे. त्यांचे वडील प्रा. मोहम्मद गौस शेख हे बीड येथील के. एस. महाविद्यालयात प्राध्यापक असून आई गृहिणी आहेत. पालकांनी मुलांना शिक्षण, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीचे संस्कार दिले.



शेख कुटुंबात शिक्षणाला सर्वोच्च स्थान आहे. त्यांच्या दोन बहिणी एमबीबीएसचे शिक्षण घेत आहेत, तर धाकटे बंधू कामरान शेख रशियामध्ये एमबीबीएसचे शिक्षण घेत आहेत. संपूर्ण कुटुंब ज्ञानाच्या बळावर समाजात योगदान देण्याचा ध्यास घेत आहे. या कुटुंबाचे प्रेरणास्थान म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे हा त्यांचा संदेश शेख कुटुंबाने जीवनमंत्र म्हणून स्वीकारला आहे. शिक्षणामुळेच माणूस सक्षम होतो आणि समाज परिवर्तन घडवू शकतो, या विचारावर त्यांची दृढ श्रद्धा आहे.

वैद्यकीय व्यवसायासोबतच सामाजिक कार्यातही डॉ. इमरान शेख यांची विशेष रुची आहे. रुग्णसेवा, सामाजिक उपक्रम आणि जनजागृती यामधून ते समाजाप्रती आपली बांधिलकी जपत आहेत. शासन, समाज आणि लोकहिताच्या कार्यात सक्रिय योगदान देण्याची त्यांची इच्छा आहे.

तरुणाईसाठी डॉ. इमरान शेख यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी आहे. जिद्द, परिश्रम, सातत्य, संशोधनाची आवड आणि समाजसेवेची भावना यांच्या बळावर यशाचे शिखर गाठता येते, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे. १५ जुलै या वाढदिवसानिमित्त डॉ. इमरान मोहम्मद गौस शेख यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड यश आणि समाजसेवेच्या कार्यासाठी भरभरून शुभेच्छा! त्यांच्या हातून रुग्णसेवा, संशोधन आणि सामाजिक कार्य अधिकाधिक विस्तारत राहो, हीच सदिच्छा.

-----------------

**अशोक हनवते**
**संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर.**

# छत्रपती संभाजीनगर येथे २०२६ चा लोकमत बीड भूमिपुत्र पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

## नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड व जेष्ठ नेते डॉ. हारुणभाई इनामदार बीड भुमिपुत्र पुरस्काराने सन्मानित

**केज/प्रतिनिधी :** दैनिक लोकमत परिवाराच्या वतीने देण्यात येणारा लोकमत बीड भुमिपुत्र २०२६ चा पुरस्कार हा नुकताच बीड जिल्ह्यात विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना जाहिर करण्यात आला होता. या पुरस्काराचे वितरण सोमवार रोजी छत्रपती संभाजी नगर येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यामध्ये केज शहरासह तालुक्यातून केजच्या प्रथम नागरिक तथा केजच्या नगराध्यक्षा डॉ.सीताताई बनसोड व राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा केज नगरपंचायतचे गटनेते डॉ.हारूणभाई इनामदार, केज पंचायत समितीच्या माजी उपसभापती सौ.सरोजनी दादासाहेब ससाने व बीड येथून दैनिक मराठवाडा दर्शनचे संपादक दत्तात्रय हंडीबाग यांना दैनिक लोकमत परिवाराच्या वतीने २०२६ च्या बीड भूमिपुत्र पुरस्कार या पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ.हारुणभाई इनामदार हे गेल्या ३० ते ३५ वर्षापासून सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रासह विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करत आहेत.










इनामदार यांच्या केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना दैनिक लोकमत परिवाराच्या वतीने २०२६ चा लोकमत बीड भूमिपुत्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच केज नगरीच्या नगराध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात ही रमाई महिला विकास संस्थेच्या माध्यमातून सुरू झाली. त्यांनी मागील २५ ते ३० वर्षांमध्ये सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केले असून नगराध्यक्षा डॉ. सौ. सीताताई बनसोड यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांनाही लोकमत बीड भूमिपुत्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १३ जुलै २०२६ रोजी फर्न रेसिडेन्सी येथे दुपारी ४-३० वाजता माजी केंद्रीयमंत्री डॉ. भागवतराव कराड, सिनेअभिनेते अशोक शिंदे यांच्यासह लोकमत समूहाचे प्रमुख मार्गदर्शक, मान्यवरांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १८ मान्यवरांना लोकमत बीड भूमिपुत्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर व दैनिक लोकमत समूहाचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचा समारोप शेवटी स्नेह भोजनाने करण्यात आला.

## लालबहादूर शास्त्री गृहनिर्माण संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** साई रोड, आर्वी येथील लालबहादूर शास्त्री गृहनिर्माण संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष राजेश डुंगरवाल यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी संस्थेचे दिवंगत सभासद, विविध क्षेत्रातील मान्यवर विचारवंत तसेच राजकीय नेत्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर संस्थेचे सचिव उदय सोनवणे यांनी विषयपत्रिकेनुसार सन २०२५-२६ चा लेखापरीक्षण अहवाल, सन २०२६-२७ चे आर्थिक अंदाजपत्रक, लेखापरीक्षकांची नियुक्ती तसेच इतर विषयांचे सविस्तर विवेचन केले. सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. बैठकीत विकास निधी वसुलीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

तसेच सोसायटीतील प्रत्येक सदस्याने आपल्या घरासमोर वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करावे, असे आवाहन करण्यात आले. सोसायटीतील निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांबाबत ग्रामपंचायत, आर्वी कार्यालयाकडे वारंवार निवेदने देऊनही आवश्यक ती दखल घेतली जात नसल्याबद्दल सभासदांनी नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात ग्रामपंचायत आर्वी, माननीय आमदार, जिल्हाधिकारी तसेच पंचायत समिती कार्यालय यांना पुनश्च निवेदन देण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला. तसेच सोसायटीमध्ये दोन ते तीन ठिकाणी सोलार दिवे बसविणे, रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे आणि परिसरातील अस्वच्छतेमुळे वाढलेल्या डासांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्यासाठी नियमित धूर फवारणी करण्याची मागणीही संबंधित निवेदनात समाविष्ट करण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले.

सभेचा अध्यक्षीय समारोप व आभार प्रदर्शन अध्यक्ष राजेश डुंगरवाल यांनी केले.यावेळी ज्येष्ठ संचालक पांडुरंग अडसुळे, गोकुळ पाटील, श्रीमती चव्हाण, सुधीर कुलकर्णी, सांगवीकर मॅडम, श्रीमती जोशी, व्यवस्थापक रसाळ तसेच संस्थेचे सभासद उपस्थित होते.

## ठाण्यातील सर्व अनधिकृत होर्डिंग्स तात्काळ हटवा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे निर्देश

**मुंबई /प्रतिनिधी :** ठाण्यात सोमवारी धक्कादायक घटना घडली होती. ठाण्याच्या ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील तीन हात नाका परिसरातील फुट ओव्हर ब्रिजवर लावण्यात आलेला वाढदिवसाचा बॅनर सोमवारी सकाळी अचानक खाली कोसळला. ब्रिजच्या खालून रस्त्यावरून जाणाऱ्या एका दुचाकीस्वाराच्या डोक्यावर हा बॅनर पडला होता. सुदैवाने दुचाकीस्वार आणि सह प्रवाशाला गंभीर दुखापत झाली नाही. मात्र या घटनेने नागरिकांमध्ये घबराटीचं वातावरण पसरलं आणि व्हिडीओ व्हायरल झाल्याने प्रशासनाला सुद्धा जाग आली आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी ठाण्यातील सर्व अनधिकृत होर्डिंग्स तत्काळ हटवण्याचे निर्देश दिले असून सर्व मोठ्या होर्डिंग्सचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे तातडीचे आदेश दिले आहेत.

सोमवारी सकाळच्या सुमारास तीन हात नाका परिसरातील फुट ओव्हर ब्रिजवर लावण्यात आलेला एक बॅनर रस्त्यावर खाली कोसळला. खालून इस्टर्न एक्स्प्रेसवरून वाहनांची रहदारी सुरु होती आणि अशातच एका दुचाकी स्वराच्या डोक्यावर हा बॅनर कोसळला. सुदैवाने दुचाकीस्वार आणि सह प्रवाशाला गंभीर दुखापत झाली नाही. मात्र यामुळे शहरातील अनधिकृत होर्डिंगचा प्रश्न ऐरणीवर आला. नागरिकांच्या जीवाशी खेळ होत असून त्यांचा जीव टांगणीला असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. त्यानंतर प्रशासनाकडून याची गंभीर दखल घेण्यात आली.

## आंधळ्याचीवाडी शिवारातून ६ लाखाच्या केबलची चोरी

**केज/प्रतिनिधी :** तालुक्यातील विडा ते आंधळेवाडी रस्त्यालगत आंधळेवाडी शिवारातुन सहा लाख रुपये किंमतीचे १२ हजार मिटर लांबीचे तांब्याच्या धातूचे केबल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या प्रकरणी सरगम एनर्जी लि बार्शी अंतर्गत आंधळेवाडी प्रकल्पाचे मॅनेजर सतीश जाधवर यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्याविरुद्ध सोमवारी केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. बुधवार ( दि. ८ ) रात्री सहा ते गुरुवार ( दि. ९ ) सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान विडा ते आंधळ्याचीवाडी जाणारे रस्त्या लगत शेत सर्वे नं २९ मधील कुसुम सोलार मुख्यमंत्री सौर कृषीवाहीनी च्या सौर प्रकल्पाच्या ठिकाणी असलेले लाल, काळ्या रंगाचे तांब्याचे धातुचे १२ हजार मीटर लांबीचे केबल ज्याचीकिं अंदाजे ६ लाख रुपये आहे. ते कोणीतरी अज्ञात चोरट्याने कटर च्या साहयाचे कापून चोरुन नेल्या प्रकरणी सरगम एनर्जी लि बार्शी अंतर्गत आंधळ्याचीवाडी चे मॅनेजर सतीश इंद्रजित जाधवर यांच्या फिर्यादीवरू अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात सोमवारी गुन्हा नोंद झाला आसून पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शना खाली जमादार हनुमान मुंडे हे पुढील तपास करीत आहेत.




## आज जपून ठेवलेला पाण्याचे थेंब, भविष्यातील पाणी टंचाई टाळेल

### वर्षाजल संधारणासाठी महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांचे आवाहन नागरिकांना आवाहन पाणी अडवा, जमिनीत जिरवा मोहिमेबाबत जनजागृती

**ठाणे/प्रतिनिधी :** आज जपून ठेवलेला पाण्याचा प्रत्येक थेंब, भविष्यातील पाणी टंचाई टाळेल असा संदेश देत ठाणे महानगरपालिकेने शहरातील नागरिक, गृहनिर्माण संस्था, व्यापारी संकुले, शैक्षणिक संस्था तसेच औद्योगिक आस्थापनांना वर्षाजल संधारण (ठरळप थरींशी क्रींशिींळपस) प्रणाली प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

हवामानातील बदल, 'एल निनो'सारख्या जागतिक हवामानविषयक घटनांमुळे अनियमित पाऊस यामुळे भविष्यात पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. जलसंकटाच्या पार्श्र्वभूमीवर प्रत्येकाने पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

प्रत्येक इमारतीच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी संकलित करून ते भूजल पुनर्भरणासाठी वापरणे ही काळाची गरज बनली आहे. पावसाच्या पाण्याचा योग्य वापर केल्यास भविष्यातील पाणीटंचाई कमी करण्यास मोठी मदत होऊ शकते.

वर्षाजल संधारणामुळे भूजल पातळीत वाढ होऊन विहिरी, बोअरवेल आणि नैसर्गिक झरे अधिक काळ पाण्याने भरलेले राहतात. तसेच उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता वाढून पाणीटंचाईच्या समस्येवर प्रभावी उपाय मिळू शकतो. शेतीसाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होते, तर पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षणही साध्य होते.

याशिवाय, पावसाचे वाहून जाणारे पाणी नियंत्रित झाल्याने पूरस्थितीचा धोका कमी होण्यास मदत होते. टँकर किंवा इतर पर्यायी पाणीपुरवठ्यावर होणारा खर्चही कमी होतो. योग्य प्रक्रियेनंतर हे पाणी विविध घरगुती आणि अन्य उपयोगांसाठी वापरता येऊ शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, भावी पिढ्यांसाठी पाण्याचा शाश्र्वत साठा निर्माण करून जलसुरक्षेला बळकटी मिळते.

ठाणे महानगरपालिकेने सर्व नागरिक, संस्था व आस्थापनांनी आपल्या परिसरात वर्षाजल संधारण प्रणाली उभारून पाण्याच्या संवर्धनासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. पावसाचा प्रत्येक थेंब जपा, भविष्यातील पाणी सुरक्षित करा हा संदेश देत महापालिकेने जलसंवर्धन ही सामूहिक जबाबदारी असे नमूद केले आहे.

## वाहतूक नियमांचे उल्लंघन व हेल्मेटचा वापर न केल्यामुळे आणखी एक बळी; नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे लातूर पोलिसांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरात पुन्हा एकदा वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे दुर्दैवी अपघातात एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेच्या अनुषंगाने लातूर पोलीस नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत व दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करण्याबाबत आवाहन करीत आहेत.

दि. १३ जुलै २०२६ रोजी टिना चौक, लातूर येथे झालेल्या अपघातात दुचाकी चालकाच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या धडकेत संध्या संगमेश्वर स्वामी (वय ३९ वर्षे, रा. हरंगुळ खुर्द, ता. लातूर) या गंभीर जखमी झाल्या. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात संबंधित वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

प्राथमिक तपासात असे निदर्शनास आले आहे की, वाहतूक नियमांचे पालन न करणे तसेच हेल्मेटचा वापर न करणे यामुळे अपघातातील दुखापतीचे गांभीर्य वाढले. हेल्मेट हे केवळ दंड टाळण्यासाठी नसून जीव वाचविणारे सुरक्षा कवच आहे. अपघाताच्या वेळी डोक्याला होणाऱ्या गंभीर दुखापती टाळण्यासाठी दर्जेदार व मानांकित हेल्मेटचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे.

लातूर पोलीसांकडून सातत्याने वाहतूक जनजागृती मोहीम, हेल्मेट वापराबाबत प्रबोधन, तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध विशेष कारवाई करण्यात येत आहे. मात्र, केवळ पोलिसांच्या कारवाईवर अवलंबून न राहता प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे पालन करणे ही काळाची गरज आहे. हेल्मेट घाला सुरक्षित राहा. वाहतूक नियमांचे पालन करा आपल्या कुटुंबाचे हसू कायम ठेवा.

## सोनोग्राफी रिपोर्टवरून वाद, सासू अनब पतीने अंध माय-लेकाला विहिरीत ढकललं; साडेतीन वर्षाच्या चिमुकल्याचा दुर्दैवी अंत

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील किनगाव येथे एक अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना उघडकीस आली आहे. कौटुंबिक कलहातून सासू आणि पतीने आपल्याच अंध पत्नीसह साडेतीन वर्षांच्या मुलाला विहिरीत ढकलून दिले. या क्रूर कृत्यात साडेतीन वर्षाच्या निष्पाप बालकाचा जागीच बुडून मृत्यू झाला आहे, तर त्याची अंध माता गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

किनगाव शिवारातील एका विहिरीत महिला आणि लहान मुलगा पडल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन स्थानिक नागरिकांच्या मदतीने दोघांना बाहेर काढले. दुर्दैवाने साडेतीन वर्षाचा मुलगा मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले, तर महिला गंभीर जखमी होती. विहिरीत पडलेले दोघेही अंध असल्याने सुरुवातीला हा घातपात नसून केवळ एक अपघात असावा, असा अंदाज पोलिसांकडून व्यक्त केला जात होता.

## २० कि.मी. अंतरातील,चारचाकी वाहनांना टोलमुक्ती देण्याची मागणी!

### केज जवळील उमरी टोल नाक्यावर स्थानिक शेतकरी, वाहन चालक मालकांचे चक्काजाम आंदोलन

**केज/प्रतिनिधी :** केज जवळील उमरी टोल नाका (प्लाझा) परिसरातील २० किलोमीटर अंतरातील,चारचाकी वाहनांना टोलमुक्ती देण्यात यावी. या मागणीसाठी उमरी टोल नाक्यावर स्थानिक शेतकरी, वाहन चालक, मालक यांचे वतीने काल चक्काजाम आंदोलन करण्यात आले. परंतु महसूल प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीने सदरील आंदोलन हे आंदोलनकर्त्यांनी तात्पुरत्या स्वरूपात मागे घेतले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील उमरी शिवरतील केज-बीड राज्यमहामार्गावर भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरणाच्या वतीने एचपीएम कंपनी मार्फत टोल नाका सुरू आहे. सदरील टोल नाक्यापासून वीस किलोमीटर अंतरावरील स्थानिक चार चाकी वाहने, शेतकऱ्यांचा शेतीमाल वाहून नेणारे वाहने यांना या टोल नाक्यावरून सारखे येणे जाणे करावे लागत आहे.




या दरम्यान सदरील टोल नाक्यावर प्रत्येक फेरीदरम्यान टोल वसूल केला जातो. ही बाब अन्यकारक असून प्रत्येक वेळी टोल वसुली करणे म्हणजे स्थानिकांची आर्थिक लूटमार केल्यासारखेच आहे. प्रशासनाने तात्काळ संबंधित टोल कंपनीला पत्रव्यवहार करून टोलनाक्याच्या कार्यक्षेत्रातील २० किलोमीटर अंतरावरील शेतकऱ्यांच्या चार चाकी वाहनांना पूर्णपणे टोलमुक्ती देण्यात यावी.

या मागणीसाठी काल मंगळवार दिनांक २९ जुलै २०२६ रोजी सकाळी ११-३० वाजण्याच्या दरम्यान क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक शेतकरी व वाहन चालक-मालक यांनी उमरी टोल नाक्यावर चक्काजाम आंदोलन केले.

या आंदोलनादरम्यान संबंधित टोलनाका कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी व महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारून संबंधित टोलनाका कंपनी व प्रशासनास वरील मागणी अनुसार कळवून आठ दिवसांत वरिष्ठांच्या अहवालानुसार कार्यवाही करण्यात येईल. असे आश्र्वासन दिले. या लेखी निवेदनावर क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, अजय वाघमारे, दादासाहेब गुंड, बाबासाहेब देशमुख, अमोल चौधरी, मोहन ढाणे, बालाजी घुले यांच्यासह २४ जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नवतंत्रज्ञानाचा प्रसार व प्रशिक्षणातून दुग्ध उत्पादनात वाढ शक्य - जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

## लातूरमध्ये पशुवैद्यकांसाठी विभागीय तांत्रिक चर्चासत्र

**लातूर/प्रतिनिधी :** दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होणे आवश्यक आहे. त्यासाठी पशुपालकांपर्यंत नवतंत्रज्ञान पोहोचविणारे विस्तार शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठान, पशुसंवर्धन विभाग आणि एमएसडी पशु आरोग्य यांच्या संयुक्त विद्यमाने 'भविष्योन्मुख पशुवैद्यकीय सेवा : उदयोन्मुख तंत्रज्ञान, वैज्ञानिक प्रगती आणि शाश्वत पशुधन आरोग्य' या विषयावर पशुवैद्यकांसाठी विभागीय तांत्रिक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. नानासाहेब सोनवणे, ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर बिडवई, वनामकृविचे शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, ज्येष्ठ पशुवैद्यक शास्त्रज्ञ तथा माफसूचे माजी विस्तार शिक्षण संचालक प्रा. डॉ. अनिल भिकाने, राष्ट्रीय तांत्रिक अधिकारी (एमएसडी) व पशुप्रजनन तज्ज्ञ डॉ. उमेश कुंभार, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, डॉ. सखाराम खुणे, डॉ. आर. डी. कदम, कार्याध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे व सचिव डॉ. रवींद्र डावरे उपस्थित होते.

चर्चासत्रात प्रा. डॉ. अनिल भिकाने म्हणाले की, प्रतिजैविक प्रतिरोधकता ही पशुवैद्यकीय व मानवी आरोग्यासमोरील अत्यंत गंभीर जागतिक समस्या बनली आहे.

जिवाणूजन्य आजारांवरील उपचार टाळणे हा यावर उपाय नसून, प्रतिजैविकांचा जबाबदारीने, वैज्ञानिक पद्धतीने, अचूक निदानाच्या आधारे आणि केवळ आवश्यकतेनुसारच वापर करणे गरजेचे आहे. उपचारप्रधान पशुवैद्यकीय सेवेकडून आता प्रतिबंधात्मक व पूर्वानुमानाधारित पशुवैद्यकीय सेवेकडे वाटचाल करणे ही काळाची गरज आहे.

भविष्यातील पशुवैद्यक हा केवळ उपचार करणारा चिकित्सक न राहता कळप आरोग्य तज्ज्ञ, रोगसाथशास्त्रज्ञ, अन्नसुरक्षा तज्ज्ञ आणि वन हेल्थ तत्त्वज्ञानाचा प्रभावी समन्वयक म्हणून बहुआयामी भूमिका पार पाडेल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

पशुप्रजनन तज्ज्ञ डॉ. उमेश कुंभार यांनी दुग्ध उत्पादन वाढीसाठी गाई-म्हशींची प्रजननक्षमता वाढविण्याचे महत्त्व विशद केले. वंध्यत्व उपचारामध्ये संप्रेरकांचा वापर हा नेहमी अंतिम पर्याय असावा. त्याआधी जनावरांना संतुलित व पोषक आहार देणे, तसेच गर्भाशयातील संसर्गावर योग्य उपचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या चर्चासत्रास उपायुक्त डॉ. दीपक मुळे, उपायुक्त डॉ. शिवाजी बुचाले, डॉ.



अतुल टापर, डॉ. भास्कर बोरगावकर, एमएसडीचे श्री. राजेंद्र क्षीरसागर, डॉ. राजशेखर दडके, डॉ. एस. एम. नेरळकर यांच्यासह लातूर, बीड, धाराशिव, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक आयुक्त, पशुधन विकास अधिकारी आणि मोठ्या संख्येने पशुवैद्यक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी चर्चासत्रामागील भूमिका स्पष्ट केली.

डॉ. चंद्रशेखर बिडवई यांनी ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानच्या कार्याचा आढावा घेतला, तर डॉ. नानासाहेब सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक आयुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले, तर एमएसडी पशु आरोग्याचे प्रक्षेत्र व्यवस्थापक श्री. कुणाल घुंगार्डे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## चि.आदित्य दयानंद हासबे च्या यशाबद्दल श्री अनंतपाळ नूतन माजी विद्यार्थी फाऊंडेशन च्या वतीने सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** कै. शिवराजप्पा हासबे यांचे नातू तसेच इंजिनिअर श्री.दयानंद शिवराजप्पा हासबे व इंजिनिअर सौ.शुभांगी दयानंद हासबे यांचे चिरंजीव आदित्य दयानंद हासबे यांनी देशातील अत्यंत प्रतिष्ठेच्या व स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल आदित्य चा सत्कार श्री अनंतपाळ नूतन माजी विद्यार्थी फाऊंडेशन १९९९ संस्थेच्या वतीने सचिव श्रीमती सुमित्रा तोटे व कोषाध्यक्ष व औसा येथील गंगापुरे मॅथ्स क्लासेसचे संचालक श्री माधव गंगापुरे यांनी करून कौतुक केले. यावेळी श्री दयानंद हासबे - वडील व सौ. शुभांगी हासबे- आई, आदित्यच्या आजी श्रीमती हासबे लहान भाऊ चि. अर्णव हासबे उपस्थित होते.

आदित्य यांनी JEE Advanced परीक्षेत उत्कृष्ट यश अखिल भारतीय (AIR) मिळवून खखढ गांधीनगर येथे उच्च शिक्षणासाठी निवड निश्रि्चत केली आहे.याचबरोबर त्यांनी भारतातील सर्वात कठीण गणितीय प्रवेश परीक्षांपैकी एक असलेल्या Indian Statistical Institute (ISI) प्रवेश परीक्षेत अखिल भारतीय ६५ वा क्रमांक (AIR ६५) मिळवून ISI बेंगळुरू येथील प्रतिष्ठित इ.चरींह अभ्यासक्रमासाठी निवड मिळवली आहे. चि.आदित्य च्या या अभूतपूर्व यशाबद्दल हासबे परिवारावर सर्व स्तरावर शुभेच्छा दिले जात आहेत..

## अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी २८ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज आणि तत्सम १२ पोटजातींमधील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सन २०२६ मध्ये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी २८ जुलै २०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. मातंग, मांग, मिनी मादीग, मादींगा, दानखणी मांग, महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी आणि मादिगा या १२ पोटजातींमधील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेले आणि सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेले इयत्ता दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पात्र असतील. अर्जदार विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासक्रमात सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असणे आवश्यक असून, निधीच्या उपलब्धतेनुसार गुणानुक्रमे ३ ते ५ विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्तीसाठी निवड केली जाईल.

इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, शाळेचा दाखला, सन २०२६ ची गुणपत्रिका आणि पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची पावती या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रतींसह दोन पासपोर्ट साईज फोटो जोडून आपले अर्ज डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, डाल्डा फॅक्ट्री, शिवनेरी गेट समोर, लातूर येथील महामंडळाच्या कार्यालयात २८ जुलै २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ९० टक्के अनुदानावर मिळणार ठिबक आणि तुषार सिंचन, महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांच्या शाश्वत विकासासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना (प्रति थेंब अधिक पीक) सन २०२६-२०२७ अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर ठिबक व तुषार सिंचन योजनेची अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. या कल्याणकारी योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक तसेच बहुभूधारक अशा दोन्ही गटांतील पात्र शेतकऱ्यांना विविध उपयोजनांच्या माध्यमातून एकत्रितपणे एकूण ९० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. यामध्ये दोन हेक्टरपर्यंत शेतजमीन असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ५५ टक्के, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून २५ टक्के पूरक अनुदान आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना किंवा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून उर्वरित १० टक्के पूरक अनुदान मिळून एकूण ९० टक्के अनुदान दिले जाईल. त्याचप्रमाणे दोन हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या बहुभूधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ४५ टक्के, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून ३० टक्के आणि संबंधित स्वावलंबी योजनांमधून १५ टक्के पूरक अनुदान मिळून एकूण ९० टक्के अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा प्रत्यक्ष शेतीत वापर केल्यामुळे पिकांच्या उत्पादनात आणि उत्पादकतेत मोठी वाढ होऊन शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होणार आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे पाण्याचा काटकसरीने वापर होत असल्याने शेतातील अनावश्यक तणांची वाढ रोखता येते आणि उपलब्ध पाण्यातच अधिक क्षेत्र ओलिताखाली आणणे शक्य होते. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील पात्र शेतकरी बांधवांनी महाडीबीटीच्या https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आपले ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा सुनिल कच्छवे यांनी स्वीकारला पदभार

**लातूर/प्रतिनिधी :** शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा पदभार विभागीय माहिती कार्यालय, लातूर येथे सुनिल कच्छवे यांनी आज स्वीकारला.

पदभार स्वीकारुन त्यांनी विभागीय माहिती कार्यालय, आणि लातूर जिल्हा माहिती कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेतला. विभागाच्यावतीने सहायक संचालक (माहिती) डॉ. श्याम टरके यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी लातूरचे प्र.जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, सहायक अधीक्षक अशोक माळगे, वरिष्ठ लिपिक मनिषा कुरूलकर, कनिष्ठ लिपिक कैलास लांडगे, शिपाई अशोक बोर्डे, शेख कलीम आदी उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभागाने ०८ जुलै २०२६ रोजी माहिती



व जनसंपर्क महासंचालनालयातील उपसंचालक (माहिती), गट अ (वरिष्ठ) पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने त्यांची सरळसेवेने नियुक्ती केली आहे.

## उद्धव ठाकरेंना रामरक्षा शब्द आठवला, हि ईश्वराची कृपा; त्यांनी रामरक्षा नीट बोलून दाखवावी मग आम्ही ही...; गोविंदगिरी महाराजांच थेट आव्हान

**मुंबई /प्रतिनिधी :** उद्धव ठाकरेंना रामरक्षा शब्द आठवला, हि ईश्वराची कृपा आहे. याबद्दल मी धन्यता मानतो. पण आंदोलन करताना त्यांनी रामरक्षा नीट पाठ करून बोलून दाखवावी, मग आम्हीही त्यांच्या आंदोलनात सहभागी होऊ, अशी प्रतिक्रिया गोविंदगिरी महाराज यांनी दिली आहे. संघाच्या बालेकिल्ल्यात म्हणजेच नागपूरमध्ये ठाकरेंच्या शिवसेनेकडून रामरक्षा आंदोलन करण्यात येणार आहे. उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत नागपूरमध्ये राम रक्षा आंदोलन केले जाणार आहे. त्यानंतर संपूर्ण विदर्भातील राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये हे आंदोलन होणार आहे. काँग्रेस, आप, सपा हे पक्ष सुद्धा राम मंदिर दानपेटी चोरी प्रकरणी आवाज उठवत आहेत. आपण देखील राज्यभरात आंदोलन केलं पाहिजे, अशा सूचना उद्धव ठाकरेंनी पक्षाच्या आमदारांना आणि पदाधिकाऱ्यांना केल्या आहेत. अशातच याच मुद्द्यांवर बोट ठेवत गोविंदगिरी महाराज यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

## रोहित-विराट पहिल्या सामन्यासाठी सज्ज ! एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारताचं इंग्लंडवर वर्चस्व


**मुंबई /प्रतिनिधी :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका आज (१४ जुलै) पासून सुरू होत असून, पहिला सामना बर्मिंगहॅम येथील एजबॅस्टन क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. टी-२० मालिकेत झालेल्या निराशाजनक पराभवानंतर भारतीय संघाला मालिका बरोबरीत आणण्याची संधी आहे. भारताने एकदिवसीय क्रिकेटमध्ये इंग्लंडवर सातत्याने आपले वर्चस्व कायम राखले आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यात आतापर्यंत ११० एकदिवसीय सामने खेळले गेले आहेत. त्यापैकी भारताने ६१, तर इंग्लंडने ४४ सामने जिंकले आहेत. तीन सामने अनिर्णित राहिले असून, दोन सामन्यांचा निकाल लागलेला नाही. इंग्लंडमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्यात आतापर्यंत एकूण ४४ सामने खेळले गेले आहेत. यात भारताने १६, तर इंग्लंडने २३ सामने जिंकले आहेत. एका सामन्याचा निकाल लागलेला नाही, तर दोन सामने अनिर्णित राहिले आहेत. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली संघ टी-२० मालिकेत अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकला नाही. भारताची सर्वात मोठी समस्या त्यांची कमकुवत फलंदाजी होती, ज्यामुळे एकदिवसीय सामन्यांमध्ये फलंदाजांकडून उत्कृष्ट कामगिरीच्या अपेक्षा वाढल्या होत्या. रोहित आणि विराटच्या पुनरागमनामुळे संघाची फलंदाजीला अधिक म जबूती मिळेल. रोहित शर्माने इंग्लंडमध्ये एकदिवसीय (ध्ऊ) क्रिकेटमध्ये नेहमीच शानदार कामगिरी केली आहे. त्याने इंग्लंडच्या मैदानावर २७ डावांमध्ये ६४.९१ च्या जबरदस्त सरासरीने १,४२८ धावा केल्या आहेत, तर एकंदरीत इंग्लंडविरुद्ध २३ एकदिवसीय सामन्यांमध्ये ९०.७७ च्या स्ट्राइक रेट आणि ४७.०० च्या सरासरीने एकूण ८४६ धावा केल्या आहेत, ज्यात ३ शतके आणि ४ अर्धशतकांचा समावेश आहे.दुसरीकडे, विराट कोहलीने इंग्लंडविरुद्ध तब्बल ३८ एकदिवसीय सामने खेळले असून ३४ डावांमध्ये ४१.०८ च्या सरासरीने १,३९७ धावा फटकावल्या आहेत.

## रेणापूर तालुक्यात स्वस्वार्थासाठी उदंड झाली पत्रकारीता : नामदेव शिंदे

**रेणापूर/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसापासून रेणापूर शहरासह तालुक्यातील काही पत्रकार आम्ही सगळे एक आहोत असे भासवून पत्रकारितेचा गैरवापर करून पत्रकारिता क्षेत्राला अशोभनीय कार्य करीत आहेत तेव्हा पत्रकारितेला बदनाम करणाऱ्या अशा स्वार्थी पत्रकारापासून अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि व्यवसायिकांनी सावध राहावे असे आवाहन रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नामदेव शिंदे यांनी केले आहे.

रेणापूर तालुक्यातील पत्रकार एक आहेत असे भासवून काही पत्रकार स्वतः च्या हितासाठी आर्थिक व साहित्याची मागणी करीत असल्याचे प्रकार रेणापूर तालुक्यातील विविध कार्यालय चर्चिले जात आहेत याबाबत रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील पत्रकाराची तातडीची बैठक होऊन सविस्तर चर्चा झाली. प्रारंभी पत्रकार संघाचे अध्यक्ष नामदेव शिंदे यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांचा यथोचित सत्कार करून



दीर्घायुष्यासाठी पत्रकारांनी शुभेच्छा दिल्या.

पत्रकार हा समाजाचा एक चौथा आधारस्तंभ आहे पत्रकाराकडून समाजाच्या मोठ्या अपेक्षा असताना काही पत्रकार वैयक्तिक स्वार्थासाठी सर्व पत्रकार सोबत आहेत असे दर्शवून स्वतः चे हित साधत असतील तर ही बाब अत्यंत निंदनीय आहे. अशा प्रकाराची पत्रकारिता गेल्या काही दिवसापासून रेणापूर तालुक्यात बोकाळली असून अशा प्रकारास सर्वच पत्रकार सहमत नाहीत. तेव्हा रेणापूर तालुक्यातील अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि व्यवसायिकांनी जागृत राहून अशा पत्रकारापासून अलिप्त रहावे असेही आव्हान नामदेव शिंदे यांनी केले आहे.

या बैठकीस विविध वृत्तपत्राचे पत्रकार रफिक शिकलकर, चंद्रकांत कातळे, सिद्धार्थ चव्हाण, शेख निजाम, गंगासिंह कदम, बालाजी कटके, ईश्वर बद्दर, कोंडीराम काळे, भरत भोसले, आर डी अपशिंगेकर यांच्यासह अनेक जण होते.

# रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटावून चा ४३ वा पदग्रहण सोहळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी ही सेवाभावी संस्था असून जगभरातील २२० पेक्षा अधिक देशात ४६०० क्लबच्या माध्यमातून १.२ मिलियन रोटरीन आपली सेवा व समर्पण देत असतात .लातूर येथील ४२ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटावून चा ४३ वा पदग्रहण सोहळा रोटरी डिस्ट्रीक्टचे प्रांतपाल इलेक्ट क्षितीज झावरे व उपप्रांतपाल नागनाथ आगवाणे यांचे उपस्थितीत पार पडला. चालू वर्षाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक रमेश चिल्ले तर सचिव म्हणून उद्योजक उमेश पत्रावळे यांनी मावळते अध्यक्ष अमोल दाडगे व सचिव पवन मालपानी यांचेकडून पदभार स्वीकारला .

यावेळी मिडटावून चे सहयोगि क्लब रोटरी क्लब ऑफ सॅटॅलाइट




अध्यक्ष सुप्रिया दाडगे व स्वाती बादाडे तसेच रोटरॅक्ट क्लब ऑफ मिडटावून च्या अध्यक्ष तनिक्षा बोरा सचिव यश बांगर व शौनक सांगवीकर यांनी पदभार स्वीकारला. तसेच इंटरॅक्ट क्लबचे ही पदग्रहण संपन्न झाले.

रोटरी क्लबच्या वतीने शहरात गेली सात वर्षांपासून निराधार ५० ज्येष्ठ नागरिकांना दोन वेळा मोफत घरपोच डबा पुरवला जातो. तसेच कॅन्सर डिटेक्शन व मोफत नेत्र तपासणी व ऑपरेशन साठी अद्ययावत व्हॅनची सुविधा सुविधा करण्यात आली आहे.या व्हॅन ग्रामीण भागातील गरजूंची तपासणी करतात व सुविधा पुरवतात. तसेच ब्लड डोनेशन, शेतकऱ्यांसाठी शेती अवजारे बँक, शाळेतील मुलांना वॉटर कुलर, आरोग्य तपासणी, वृक्ष लागवड, सेंद्रिय शेती ,गट शेती बाबतही मदत केली जाते. अशा सेवेसाठी रोटरी ची समाजात खूप चांगली प्रतिमा असून राजकारण व जातपात विरहित व्यवसायिक, डॉक्टर्स, प्राध्यापक मंडळी एकत्र येऊन यात कार्य करीत असतात.

भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात संपन्न झालेल्या पदग्रहण सोहळ्यात रोटरीचे माजी प्रांतपाल विजय भाऊ राठी मागील वर्षाचे प्रांतपाल सुधीर लातूरे, डॉक्टर सोपानराव जटाळ, अड.उदय गवारे, माधवराव पाटील टाकळीकर, शरद झरे, कवी नरसिंग इंगळे ,वेगवेगळ्या क्लब ची अध्यक्ष, सचिव, समाजातील मान्यवर व रोटरियन कुटुंबीयसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे टीम लीडर शिरीष उटगे तसेच शशिकांत मोरलावार ,लितेश शहा,अजय दुडले, अनिल पाटील ,विशाल आयाचित ,वीरेंद्र पुंडीपल्ले, प्रशांत भाटगावे,जयप्रकाश सोनी ,मोतीलाल वर्मा श्रद्धानंद अपशेट्टी, रवींद्र बनकर, किशोर दाताळ, गिरीश पेन्सलवार, संगीता लातूरे व अनेक सदस्याने खूप मेहनत घेऊन हा कार्यक्रम संपन्न केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर राजगोपाल तापडिया व ओमप्रकाश झुरळे यांनी केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.